बाप्पा मोरया...

मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दिनांक २४ सप्टेंबर २०२३। पान १

# मालमत्ता सर्वेक्षणासाठी मनपा आपल्या दारी

## महानगरपालिकेकडून मालमत्तेस मिळणार 'यूपिक आयडी'

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागाच्या आज (शनिवार, दि २३ सप्टेंबर) रोजी पार पडलेल्या करसंवादामध्ये नागरिकांनी ऑनलाइन व ऑफलाइन स्वरूपात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी मालमत्ताकरावरील सवलती, 'मालमत्ता सर्वेक्षण अभियान', 'यूपिक आयडी'बाबत माहिती व मालमत्ताकर विषयक शंकाचे निरसन साहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांच्यामार्फत करण्यात आले. यावेळी विभागाचे अधिकारी, कर्मचारीवर्ग उपस्थित होते. नागरिक व अधिकारी यांच्यामध्ये थेटसंवाद असा उद्देश असलेल्या करसंवादामध्ये शनिवारी विभागाने नागरिकांना विचारलेल्या प्रश्नांबाबत विभागाकडून तत्काळ माहिती पुरवून नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे आदेश देण्यात आले. तत्काळ शंकाचे निरसन, समस्यांचा तातडीने निपटारा, समस्येच्या निरसनाबाबतचे तातडीच्या आदेशामुळे नागरिकांनी करसंकलन विभागाचे आभार मानले. करसंवादामध्ये साधारण १०० पेक्षा जास्त नागरिकांनी सहभाग नोंदविला. चालूवर्षी तीन लाख करदात्यांनी पहिल्या तिमाहीमध्ये तब्बल ४४७ कोटींचा कर जमा केला असून, आजपर्यंत तब्बल ५७० कोटींचा कर जमा झालेला आहे. सप्टेंबरअखेर ऑनलाइन स्वरूपात मालमत्ताकर भरल्यास सामान्य करामध्ये चार टक्क्यांच्या नवीन आकारणी झालेल्या मालमत्ता धारकांनी तीन महिन्यामध्ये आगाऊ कराचा भरणा केल्यास सामान्य करामध्ये १० टक्क्यांच्या सवलतीचा लाभ घेण्याचे आवाहनही करसंवादामधून करण्यात आले. याचबरोबर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये तब्बल सहा लाख नोंदणीकृत मालमत्ता आहेत. महापालिकेच्या उत्पन्नवाढीच्या दृष्टीने 'मालमत्ता सर्वेक्षण अभियान' सुरू करण्यात येणार असून, याद्वारे मालमत्तांची संपूर्ण माहिती जमा केली जाणार आहे. या अभियानामार्फत अत्याधुनिक नकाशे प्रणालीद्वारे ब्लॉकची निर्मिती करून मालमत्तांना विशिष्ट मालमत्ता क्रमांक (यूपिक आयडी – युनिक प्रॉपर्टी आयडेंटिफिकेशन कोड) देण्यात येणार आहे. ज्याप्रमाणे नागरिकांना आधार क्रमांक देण्यात आला आहे, त्याप्रमाणे मालमत्तेसाठी 'यूपिक आयडी' मिळणार आहे. यामुळे नागरिकांना मालमत्तेसंदर्भात सर्व माहिती एकाच क्लिकवर उपलब्ध होऊन त्यांचा वेळ वाचणार आहे.




> **नागरिकांना आपल्या मालमत्तेची माहिती ठेवता येण्यासाठी, करामधील असमानता दूर करण्यासाठी 'मालमत्ता सर्वेक्षण अभियान'चा लाभ नागरिकांना होणार आहे. महापालिकेने सर्वेक्षणासाठी नेमलेले अधिकारी, महिला व सर्वेक्षणासाठी नेमण्यात आलेले कर्मचारी यांना नागरिकांना मालमत्तेची माहिती देऊन सहकार्य करावे. महापालिकेच्या करसंवादामध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नांचा निपटारा त्याच वेळी करण्यासाठी आम्ही आग्रही असून, नागरिकांनी दरवेळीप्रमाणे येत्या काळातही विभागाच्या प्रत्येक सुविधांचा लाभ घेताना करसंवादातून आपले प्रश्न व शंकाचे निरसन करून घ्यावे.**
> – नीलेश देशमुख, **सहाय्यक आयुक्त, करआकारणी व करसंकलन विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

# बाप्पांपुढे साकारलायं चांद्रयान मोहिमेचा ३० फुटी देखावा!

## इन्फिनिटी इंजिनिअरिंग सोल्युशन्स कंपनीत चांद्रयानची हुबेहूब प्रतिकृती

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्रासह देशभरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने साजरा केला जात आहे. गणपती उत्सवात आपल्याला वेगवेगळे देखावे बघायला मिळतात. देशाची मान अभिमानाने उंच केलेली मोहीम म्हणजे चांद्रयान मोहीम होय. असाच एक भव्य देखावा पिंपरी-चिंचवडमध्ये बघण्यास मिळत असून, चांद्रयानची तब्बल २५ ते ३० फूट प्रतिकृती देखावा म्हणून बनवण्यात आली आहे. त्यामुळे हा देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. चांद्रयान तीन मोहीम इसरोने यशस्वीरित्या पार पाडली आणि अवघ्या जगभरात भारताचं कौतुक झालं. आता हेच चांद्रयान गणेशोत्सवात देखावा म्हणून घराघरात बघायला मिळत आहे. घरगुती गणपतीपासून ते मंडळाचे गणपती चांद्रयानचा देखावा सादर करत आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातील भोसरीमधील इन्फिनिटी इंजिनिअरिंग सोल्युशन्स कंपनीत चांद्रयानची हुबेहूब प्रतिकृती देखावा म्हणून गणपती बाप्पाच्या चरणी सादर केली आहे. तब्बल २५ ते ३० फूट उंच असलेली ही प्रतिकृती गणेश भक्तांचं लक्ष वेधून घेत आहे. याच कंपनीने चांद्रयान तीनसाठी खारीचा वाटा उचलत फिक्चर पार्ट चांद्रयानसाठी बनवले होते, अशी माहिती कंपनीचे मालक अनंत हेंद्रे यांनी दिली. चंद्रयान मोहीम यशस्वीरित्या पार पडल्याने आम्हाला देखील गणपती देखावा म्हणून चांद्रयान मोहीम सादर करायची होती, त्यासाठी आम्ही थर्माकॉलचा वापर करत १५ जणांच्या पथकाने चांद्रयानचा देखावा गणपती बाप्पापुढे सादर केला आहे. चांद्रयान बनवण्यासाठी १५ जणांच्या टीमला सहा दिवस लागल्याचं अनंत हेंद्रे यांनी सांगितले.



> **१५ जणांच्या पथकाने देखावा केला तयार**
> » **२५ ते ३० फूट उंच असलेली ही प्रतिकृती गणेश भक्तांचं लक्ष वेधून घेत आहे. चांद्रयान तीनसाठी खारीचा वाटा उचलत फिक्चर पार्ट चांद्रयानसाठी बनवले होते, अशी माहिती कंपनीचे मालक अनंत हेंद्रे यांनी दिली. चंद्रयान मोहीम यशस्वीरित्या पार पडल्याने आम्हाला देखील गणपती देखावा म्हणून चांद्रयान मोहीम सादर करायची होती, त्यासाठी थर्माकॉलचा वापर करत १५ जणांच्या पथकाने चांद्रयानचा देखावा गणपती बाप्पापुढे सादर केला.**

# पवना बंदिस्त जलवाहिनीवरून राजकारण!

## वाढत्या लोकसंख्येबरोबर शहरातील पाण्याची समस्या गंभीर



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** मावळातील पवना धरणातून निगडीपर्यंत बंदिस्त जलवाहिनीद्वारे पाणी आणण्याच्या प्रकल्पावरील स्थगिती उठविल्यानंतर शहरातील सर्वच राजकीय पक्षांनी स्वागत केले. तर, दुसरीकडे याच पक्षांच्या मावळातील नेत्यांनी मात्र तीव्र विरोध करत प्रकल्प होऊ देणार नसल्याची भूमिका घेतली. राजकीय पक्षांच्या सोईस्कर राजकारणामुळे प्रकल्पाचे भविष्य अधांतरी दिसते. परिणामी, वाढत्या लोकसंख्येबरोबर शहरातील पाण्याची समस्या गंभीर होण्याची चिन्हे आहेत. पिंपरी- चिंचवड शहराकरिता पवना धरणातून १९८५ पासून पाणी घेतले जाते. दिवसाला पवनेतून ५१०, चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रातून ७० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून १३ असे ५९३ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणीपुरवठा केला जातो. वाढत्या शहराला हे पाणी पुरेसे नसल्याने साडेतीन वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. लोकसंख्या वाढत असतानाच पाण्याची मागणीही सातत्याने वाढत आहे. महापालिकेने केंद्र आणि राज्याच्या आर्थिक सहकार्याने २०१० मध्ये पवना बंदिस्त जलवाहिनीचे काम हाती घेतले, मात्र जलवाहिनी प्रकल्प सुरू असताना २०११ मध्ये मावळातील शेतकऱ्यांचे आंदोलन झाले. यामध्ये आंदोलक शेतकऱ्यांवर गोळीबार झाला. हा मुद्दा चिघळल्याने तत्कालीन शासनाने प्रकल्पाला स्थगिती दिली. वाढत्या शहराचा विचार करत शासनाने तब्बल १२ वर्षांनी प्रकल्पावरील स्थगिती उठविली. पिंपरी-चिंचवडमधील सर्वच राजकीय पक्षांनी त्याचे स्वागत केले. अजित पवार गट आणि भाजपमध्ये श्रेयवादाची लढाई झाली. मात्र, याच प्रमुख पक्षांच्या मावळातील नेत्यांनी हा प्रकल्प कायमचा रद्द व्हावा, अशी भूमिका घेतली. पुन्हा प्रकल्पाला विरोध सुरू झाला. अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके आणि भाजपचे माजी आमदार बाळा भेगडे यांनी प्रकल्पाला विरोध असल्याचे ठामपणे सांगितले. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांचे नेते मतांसाठी या प्रकल्पावरून राजकारण करताना दिसून येतात. नेत्यांच्या राजकारणामुळे पिंपरी-चिंचवडकरांना मात्र मुबलक, स्वच्छ पाणीपुरवठ्यापासून वंचित राहावे लागत आहे. या कामावर आतापर्यंत १९५ कोटी रुपये खर्च झाला. सन २०११ मध्ये ३८७ कोटी ९२ लाखांचा प्रकल्प होता. आता प्रकल्पासाठी ९०० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, स्थगितीमुळे खर्चात दुपटीने वाढ झाली आहे.

### शहराला दिवसाआड पाणीपुरवठा

**» पिंपरी-चिंचवड शहराकरिता पवना धरणातून १९८५ पासून पाणी घेतले जाते. दिवसाला पवनेतून ५१०, चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रातून ७० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून १३ असे ५९३ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणीपुरवठा केला जातो. वाढत्या शहराला हे पाणी पुरेसे नसल्याने साडेतीन वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. लोकसंख्या वाढत असतानाच पाण्याची मागणीही सातत्याने वाढत आहे. महापालिकेने केंद्र आणि राज्याच्या आर्थिक सहकार्याने २०१० मध्ये पवना बंदिस्त जलवाहिनीचे काम हाती घेतले, मात्र जलवाहिनी प्रकल्प सुरू असताना २०११ मध्ये मावळातील शेतकऱ्यांचे आंदोलन झाले. यामध्ये आंदोलक शेतकऱ्यांवर गोळीबार झाला. हा मुद्दा चिघळल्याने तत्कालीन शासनाने प्रकल्पाला स्थगिती दिली.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये संततधार!

## रस्त्यावर पाणी साचल्याने मोठी वाहतूक कोंडी



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड शहरात शनिवारी जोरदार पाऊस झाला. दुपारी तीनच्या सुमारास सुरू झालेला मुसळधार पाऊस सायंकाळी साडेसहा वाजेपर्यंत पडत होता. त्यामुळे विविध भागांतील रस्ते जलमय झाले होते. अनेक ठिकाणी पाणी साचल्याच्या घटना घडल्या. शहरात शुक्रवारी सायंकाळी पावसाचा जोर वाढला होता. परंतु, तासाभरात पाऊस उघडला. शनिवारी सकाळपासून ढगाळ वातावरण होते. दुपारी तीनच्या सुमारास मुसळधार पाऊस सुरू झाला. पिंपरी, चिंचवड, भोसरी, आकुर्डी, निगडी, वाकड, सांगवी, पिंपळे निलख असा शहराच्या सर्वच भागांत जोरदार पाऊस झाला. सायंकाळी साडेसहापर्यंत पावसाचा जोर कायम होता. त्यानंतर पावसाचा जोर कमी झाला, तरी रिमझिम सुरूच होती. मुसळधार पावसामुळे चोहीकडे पाणीच पाणी झाले. रस्ते जलमय झाले. आकुर्डीसह काही ठिकाणी पाणी साचल्याच्या घटना घडल्या. रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांत पाणी साचल्याने रस्ते जलमय झाले होते. समतल विलगकामध्ये मोरवाडी, कासारवाडी, कुंदननगर भागात पाणी साचल्याने त्याचा फटका वाहतुकीला बसला. वाहतूक संथ झाली होती. पिंपरी ते चिंचवड रस्त्यावर मोठी वाहतूककोंडी झाली होती. वाहनांच्या लांबच रांगा लागल्या होत्या. महापालिका यंत्रणा सतर्क असल्याचे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल यांनी सांगितले.

# अतिरिक्त आयुक्त जगतापांच्या नियुक्तीला शासनाची मान्यता

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड महापालिकेतील स्थानिक अधिकाऱ्यांसाठी रिक्त असलेल्या तिसऱ्या अतिरिक्त आयुक्तपदी नगरसचिव उल्हास जगताप यांची यापूर्वीच नियुक्ती करण्यात आली आहे. आता त्यांच्या नियुक्तीला राज्य शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचा आदेश शासनाच्या उपसचिव प्रियांका कुलकर्णी छापवाले यांनी जारी केला आहे. नवीन आकृतीबंधानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेत तीन अतिरिक्त आयुक्तांची पदे निर्माण झाली आहेत. त्यातील दोन अतिरिक्त आयुक्त प्रतिनियुक्तीवरचे आणि महापालिका अधिकाऱ्यां करिता पदोन्नतीसाठी एक याप्रमाणे तीन पदांची विभागणी करण्यात आली आहे. सध्या महापालिकेत राज्य सेवेतील दोन अतिरिक्त आयुक्त प्रतिनियुक्तीवरील आहेत. महापालिकेचे नगरसचिव उल्हास जगताप यांच्याकडे १९ फेब्रुवारी २०२१ पासून अतिरिक्त आयुक्तपदाचा प्रभारी पदभार देण्यात आलेला आहे. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी पाठविलेला प्रस्ताव आणि शासन स्तरावरील समितीची शिफारस विचारत घेऊन जगताप यांची अतिरिक्त आयुक्तपदी निवडीने पदस्थापना करण्यास शासनाने मान्यता दिली. महापालिका आस्थापनेवरील पात्र एकमेव अधिकारी असल्याने जगताप यांची अतिरिक्त आयुक्त पदी नियुक्ती केली आहे.

# रुग्णालयांना निधी कमी पडू देणार नाही!

## आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध : अजित पवार

**पुणे| न्यूज एक्सप्रेस मराठी|**

सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यविषयक सोयी सुविधा वेळेत आणि माफक दरात पुरवण्यासाठी राज्यातील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यास शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी येथे बोलताना केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील बाह्य रुग्ण कक्षाच्या (अपघात विभाग) उद्घाटनप्रसंगी अजित पवार बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर,अप्पर पोलिस अधीक्षक आनंद भोईटे, महावितरणचे मुख्य अभियंता सुनिल पावडे, तहसीलदार गणेश शिंदे, उप विभागीय पोलीस अधिकारी गणेश इंगळे, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत म्हस्के, उप अधिष्ठाता, डॉ.अंजली शेटे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल शिंदे, प्रशासकीय अधिकारी नंदकुमार कोकरे, डॉ. संतोष भोसले आदी उपस्थित होते.



पवार म्हणाले, सर्वसामान्य नागरिकांना महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मूत्रपिंड प्रत्यारोपण व इतर गंभीर उपचार व शस्त्रक्रियांसाठी लाभार्थी कुटुंबाला प्रतिवर्षी रुपये ५ लाखांपर्यंत विमा संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचबरोबर इतर वैद्यकीय योजनाही राबविल्या जात आहेत. रुग्णालयातील आरोग्य विषयक सोयी सुविधांसाठी निधीची कमतरता कमी पडू देणार नाही. पण बाह्य रुग्ण कक्षाच्या माध्यमातून रुग्णांना उत्तमातील उत्तम सेवा देवून चांगले कार्य घडावे अशी अपेक्षा आहे. बारामतीतील शासकीय रुग्णालयात सर्वसामान्य नागरिकांना वेळेत सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात. रुग्णाला उपचारासाठी पुण्यामध्ये पाठवण्यापूर्वी वरिष्ठांनी उपलब्ध सुविधांची खातरजमा करावी. रुग्णालयात दर्शनी भागात इलेक्ट्रॉनिक फलक बसवावेत. डॉक्टर, विद्यार्थी, परिचारिका व इतर कर्मचारी यांना ओळखपत्र बंधनकारक करावे. रुग्णालयात हजेरीसाठी बायोमेट्रिक उपकरणे वापरावी. दर महिन्याला बायोमेट्रिक हजेरीचा आढावा घेण्यात यावा. १०८ क्रमांक रुग्णवाहिकेची माहिती नागरिकांना होणे गरजेचे आहे. रुग्णालयातील एखादे महत्वाचे पद रिक्त झाल्यास तातडीची गरज म्हणून पर्यायी व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देश यावेळी अजित पवार यांनी दिले. उल्लेखनीय कार्य करणारे मेंदू विकार तज्ज्ञ डॉ. संजय व्होरा, कर्करोग तज्ज्ञ डॉ.चकोर व्होरा, अतिदक्षता विभाग तज्ज्ञ डॉ. प्रसाद सुर्यवंशी, डॉ. ठाकूर डॉ.संतोष भोसले यांचा उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बाह्य रुग्ण विभागामध्ये अतिदक्षता विभाग, ६ खाटाचे अतिदक्षता विभाग, सुसज्ज असे २ वॉर्ड पुरुष व महिलासाठी तयार करण्यात आले.

### विविध विकासकामांची पाहणी

» उपमुख्यमंत्री पवार यांनी कन्हेरी वन उद्यानातील तलाव, जळोची स्मशानभूमी जवळील ओढ्याचे खोलीकरण, बारामती नगरपरिषदेच्या इमारतीचे बांधकाम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियम जवळील वसंतराव पवार नाट्यगृह व शॉपिंग कॉम्प्लेक्स च्या इमारतीचे बांधकाम, बारामती नवीन बस स्थानकातील सुशोभीकरण आणि लँडस्केपच्या कामांची पाहणी केली.

# गणपती विसर्जनासाठी पालिकेची जय्यत तयारी!

## सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून १८ विसर्जन घाटांवर जवानांची नियुक्ती

**पुणे| न्यूज एक्सप्रेस मराठी|**

गणेशोत्सवातील पाचव्या दिवशी होणाऱ्या घरगुती गणेश विसर्जनासाठीची महापालिकेची तयारी पूर्ण झाली आहे. सार्वजनिक स्वच्छता, मिरवणूक मार्गावरील स्वच्छता, औषधोपचार व्यवस्था, कीटकनाशक फवारणी, विसर्जन घाटांवरील कर्मचारी व्यवस्थापन, जीवरक्षकांच्या नियुक्त्या, सुरक्षा यंत्रणेची कामे पूर्ण झाली आहेत. विसर्जनासाठी अस्तित्वातील हौदांची दुरुस्ती करण्यात आली असून, रंगकाम पूर्ण झाले आहे. रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली असून, रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात आले आहेत. विसर्जन घाटांवर अग्निशमन दल आणि जीवरक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. प्रभाग अधिकारी, आरोग्य निरीक्षक, मुकादम, विद्युत विभागातील कर्मचारी यांना स्वतंत्रपणे वेगवेगळ्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. रस्त्यावरील प्रकाश व्यवस्थेची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. गणेश मूर्ती संकलन आणि दान केंद्रांची व्यवस्थाही क्षेत्रीय कार्यालयनिहाय करण्यात आली आहे. नदी आणि नैसर्गिक जलस्त्रोतांच्या ठिकाणी धोका नियंत्रक कठडे उभारण्यात आले आहेत. अग्निशमन दलाकडून १८ विसर्जन घाटांवर सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून जवानांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच १३० खासगी जीवरक्षकही तैनात करण्यात आले आहेत. रात्रपाळीत काम करणाऱ्या जीवरक्षकांना फ्लोरोसेन्ट जॅकेट्स देण्यात आले असून नदी किनारी सुरक्षेच्या दृष्टीने दोरखंड लावण्यात आले आहेत. अग्निशमन दलाची बिनतारी संदेश यंत्रणाही कार्यान्वित करण्यात आली आहे. गणेशोत्सव ‘स्वच्छ’ व्हावा आणि संस्कृतीसोबत निसर्गाचेही



संवर्धन व्हावे या उद्देशाने यंदाही स्वच्छ सेवकांकडून घाटांवरील निर्माल्य संकलन केले जाणार आहे. त्यासाठी शहरातील दोनशेहून अधिक कचरावेचकांना ४० घाटांवर नियुक्त करण्यात आले आहे. निर्माल्य नदीत जाऊ नये, यासाठी स्वच्छ सेवक काम करणार आहेत. गेल्या १५ वर्षांपासून शहरातील सर्व प्रमुख विसर्जन घाटांवर स्वच्छ संस्थेचे कचरावेचक सर्व प्रमुख विसर्जन घाटांवर निर्माल्य संकलन उपक्रम राबवीत आहेत. पाचव्या आणि अनंत चतुर्दशीदिनी २०० हून अधिक कचरावेचक काम करणार आहेत. सन २००७ पासून सुरू झालेल्या या उपक्रमातून दर वर्षी अंदाजे १०० टनांहून अधिक निर्माल्य गणपती विसर्जनादरम्यान खतनिर्मितीसाठी कचरावेचक वेगळे गोळा करतात. फुले, पाने, दुर्वा इत्यादी निर्माल्य पूजेनंतर कचऱ्यात किंवा नदीमध्ये न जाऊ देता महानगरपालिकेतर्फे खतनिर्मितीसाठी पाठवले जाते. यंदाही संकलित केलेले निर्माल्य वेगवेगळे करून ते खतनिर्मितीसाठी पाठविण्यात येणार आहे. भाविकांनी निर्माल्य शहरात इतस्त्र, पुलांवर किंवा कोणत्याही जलप्रवाहात न टाकता स्वच्छ संस्थेच्या कचरावेचकांकडे द्यावे, असे आवाहन स्वच्छ संस्थेकडून करण्यात आले आहे. औंध गाव (राजीव गांधी पूल), शांता आपटे घाट, अब्दुल कलाम जलतरण तलाव, महादेव घाट, वाकेश्वर मंदिर गणपती घाट पाषाण, सोमेश्वरवाडी गणपती घाट पाषाण, एस एम जोशी पूल, ओंकारेश्वर (भिडे पूल), कात्रज तलाव, शाहू उद्यान जलतरण केंद्र, संगम घाट हौद आणि नदीपात्र, कात्रज घाट, थोरवे शाळा, भारती विद्यापीठजवळ, तुळशीबागवाले कॉलनी मैदान, धनकवडी टपाल कार्यालय, मुंढवा पूल, साईनाथनगर, वडगाव शेरी जुना घाट, वडगाव शेरी नवा घाट, इंदिरानगर पोलीस चौकी या ठिकाणी कचरावेचकांची नियुक्ती केली जाणार आहे.

### २०० कचरावेचक करणार काम

» पाचव्या आणि अनंत चतुर्दशीदिनी २०० हून अधिक कचरावेचक काम करणार आहेत. सन २००७ पासून सुरू झालेल्या या उपक्रमातून दर वर्षी अंदाजे १०० टनांहून अधिक निर्माल्य गणपती विसर्जनादरम्यान खतनिर्मितीसाठी कचरावेचक वेगळे गोळा करतात. फुले, पाने, दुर्वा इत्यादी निर्माल्य पूजेनंतर कचऱ्यात किंवा नदीमध्ये न जाऊ देता महानगरपालिकेतर्फे खतनिर्मितीसाठी पाठवले जाते. यंदाही संकलित केलेले निर्माल्य वेगवेगळे करून ते खतनिर्मितीसाठी पाठविण्यात येणार आहे.

# पुण्यात होणार महाराष्ट्र अमृत कलश संकलन!

## भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची उपस्थिती

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर देशभरातून 'मेरी माटी मेरा देश' अभियान राबविण्यात आले. यानिमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) महाराष्ट्र, आणि नेहरू युवा केंद्र संघटन यांच्यावतीने हजारो विद्यार्थ्यांमार्फत महाराष्ट्रात राज्यभरातील महाविद्यालयांमध्ये हे अभियान राबविण्यात येत आले. यामध्ये आतापर्यंत राज्यभरातील २२ विद्यापीठांमधून विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी आपला सहभाग नोंदवला आहे. या अमृत कलशाचे एकत्रीकरण २६ सप्टेंबर २०२३ रोजी पुण्यात कॉलेज ऑफ इंजिनियरिंग इथे होणार आहे. कार्यक्रमासाठी माजी केंद्रीय मंत्री, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. तसेच २२ विद्यापीठांचे कुलगुरू आणि प्रतिनिधीही उपस्थित असतील अशी माहिती मेरी माटी मेरा देशचे प्रदेश संयोजक राजेश पांडे यांनी दिली आहे. पांडे म्हणाले, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी देशातील शूरवीरांचा गौरव करण्यासाठी आणि शहिदांना आणि हुतात्म्यांना वंदन करण्यासाठी 'मेरी माटी मेरा देश' या अभियानाची घोषणा केली. साऱ्या देशाला कृतज्ञतेच्या आणि एकात्मतेच्या भावनेने जोडणारे हे अभियान आहे. याअंतर्गत गावागावांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये अमृतवाटिका तयार करण्यात येत आहेत, शिलालेख लावण्यात येत आहेत.



या अभियाना अंतर्गत हजारो हातांनी गोळा केलेली माती प्रतीकात्मक स्वरूपात अमृत कलशामधून जमा करण्यात येत आहे.र ाष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र यांच्यावतीने राज्यातील महाविद्यालयां मधील उपक्रमातून जमा झालेले अमृतकलश प्रातिनिधिक स्वरूपात भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याकडे सन्मानपूर्वक सुपूर्द करण्यात येत आहे. येत्याकाळात देशभरातून येणारे अमृत कलश दिल्लीमध्ये एकतरी करण्यात येतील आणि त्यातून देशाच्या एकात्मतेचे प्रतीक असलेली अद्वितीय अमृतवाटिका उभी राहणार आहे. तसेच पुणेकर नागरिकांपर्यंत अभियान नेण्यासाठी शहर भाजपतर्फे एकाच दिवसात घरोघरी जाऊन ३८ हजार कुटुंबांकडून अमृतकलशात माती गोळा करण्यात आली होती. या अभियानात आतापर्यंत राज्यभरातील २२ विद्यापीठांनी आपला सहभाग नोंदवला आहे. यात १५१७ महाविद्यालयांनी ४१७६ गावांतून ३४१४अमृत कलश गोळा केले आहेत. तर, विविध ठिकाणी ११६४ अमृत वाटिका आणि ७८७ शिलफलक स्थापित केले आहेत. शाळा, कॉलेज, गावे, स्मारके अशा ३३४४ ठिकाणी नागरिकांना पंचप्रण ची शपथ विद्यार्थ्यांमार्फत देण्यात आलेली आहे. या अभियानाचा विश्वविक्रम व्हावा यासाठी 'सेल्फी विथ मेरी माटी' हा उपक्रम देखील एनएसएस द्वारे राबवला गेला. यात ५७०८८ लोकांनी आपला माती सोबतच सेल्फी आपलोड करून अभियानात भाग घेतला आहे.

### एकात्मतेच्या भावनेने जोडणारे अभियान

**» साऱ्या देशाला कृतज्ञतेच्या आणि एकात्मतेच्या भावनेने जोडणारे हे अभियान आहे. याअंतर्गत गावागावांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये अमृतवाटिका तयार करण्यात येत आहेत, शिलालेख लावण्यात येत आहेत. पुणेकर नागरिकांपर्यंत अभियान नेण्यासाठी शहर भाजपतर्फे एकाच दिवसात घरोघरी जाऊन ३८ हजार कुटुंबांकडून अमृतकलशात माती गोळा करण्यात आली होती. या अभियानात आतापर्यंत राज्यभरातील २२ विद्यापीठांनी आपला सहभाग नोंदवला आहे. यात १५१७ महाविद्यालयांनी ४१७६ गावांतून ३४१४ अमृत कलश गोळा केले आहेत.**

# फिल्म माझे करिअर राजकारण माझी सेवा तर नृत्य साधना!

## आय लव्ह पुणे, आय लव्ह पुणेकर : खा. हेमा मालिनी

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** फिल्म माझे करिअर आहे नृत्य माझी साधना आहे आणि पॉलीटिक्स माझी सेवा आहे. असे भावपूर्ण उद्गार अभिनेत्री, नृत्यांगना व पुणे फेस्टिव्हलच्या पॅट्रन खा. हेमा मालिनी यांनी काढले. ३५ व्या पुणे फेस्टिव्हल अंतर्गत महिला महोत्सवाचे बालगंधर्व कलादालन येथे त्यांच्या हस्ते उद्घाटन पार पडले. त्यावेळी त्या बोलत होत्या. पुणे फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मुख्य समन्वयक ॲड. अभय छाजेड, पदाधिकारी कश्यपसिंह चुडासमा, बाळासाहेब अमराळे अतुल गोंजारी, मोहन टिल्लू, श्रीकांत कांबळे व चित्रकार महिला या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




हेमा मालिनी म्हणाल्या की, 'राधे राधे आज राधाष्टमी आहे आणि आज महिला महोत्सवाचे उद्धाटन देखील आहे ही खूप मोठी गोष्ट आहे. मी मथुरावरून येत आहे. आजचा दिवस खूप शुभ आहे. याठिकाणी येऊन मला खूप आनंद होत आहे. आय लव्ह पुणे, आय लव्ह पुणेकर अस सांगून त्या म्हणाल्या की, गेली २० वर्षे मी राजकारणात आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महिला आरक्षण विधेयक आणल त्यामुळे महिलांना ३३% आरक्षण राजकीय आरक्षण मिळणार आहे. हे फार महत्वाचे आहे.

त्या पुढे म्हणाल्या की , या पेंटिंग स्पर्धा व प्रदर्शनात अनेक आर्टिस्टने येऊन माझी पेंटिंग बनवली. पण, आज 'ड्रीम गर्ल' वर पूर्ण सब्जेक्ट बनविण्यात आला. याबद्दल आभार व्यक्त केले.आपण माझ्याबद्दल या प्रदर्शनातून व्यक्त केलेल्या भावनांमुळे मी भारावून गेले आहे. संपूर्ण देशातील कलाकार इथे येऊन आपली कला सादर करतात. या मंचावर आपली कला सादर करणारे उगवते व नवोदित कलाकार या देशात चमकत आहेत ही कौतुकाची बाबा आहे. पुणे फेस्टिव्हलच्या माध्यमातून महिलांच्या कला गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी महिला महोत्सव सुरु केला. त्यामुळे, पुण्यातील हजारो महिलांना आपली कला सादर करण्याची संधी मिळाली आहे. ही आनंदाची बाब आहे. पुणे फेस्टिव्हल अंतर्गत महिला महोत्सवतील ब्रायडल मेक अप स्पर्धेच्या संयोजिका दिपाली पांढरे यांनी स्वागत केले, पाककला स्पर्धेच्या संयोजिका करुणा पाटील यांनी प्रस्तावना केली.

### गेली २० वर्षे मी राजकारणात

**» हेमा मालिनी म्हणाल्या की, 'राधे राधे आज राधाष्टमी आहे आणि आज महिला महोत्सवाचे उद्धाटन देखील आहे ही खूप मोठी गोष्ट आहे. मी मथुरावरून येत आहे. आजचा दिवस खूप शुभ आहे. याठिकाणी येऊन मला खूप आनंद होत आहे. आय लव्ह पुणे, आय लव्ह पुणेकर अस सांगून त्या म्हणाल्या की, गेली २० वर्षे मी राजकारणात आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महिला आरक्षण विधेयक आणल त्यामुळे महिलांना ३३% आरक्षण राजकीय आरक्षण मिळणार आहे. हे फार महत्वाचे आहे.**